# व्यसनाचा पोवाडा

व्यसनाच्या पोटी झालं पुरतं नुकसान
वाया गेलं हो जीवन आता काय करू मी
झाली मानहानी आणि गेली ती नोकरी
उभा कर्जाचा डोंगर जप्ती घरावरती

घरात भांडण रोज रात्री मारहाण
शेवटी कंटाळून गेली बायको मुलं माहेरी
पत नाही हो शिल्लक उभे करीना दारात
आता करतो मुक्काम फूटपाथवरती

हातपाय हो बधीर उठे वेदनेचा डोंब
येई लिव्हरला सूज डोळे पिवळे पडती
उतरते दारु तेव्हा होतो पश्चाताप
आणि करतो निश्चय पुन्हा नाही घ्यायची

वेळ जाई जसाजसा डळमळतो निश्चय
अडखळत बोलणे घंटी वाजू लागती
पाय ओढती देहाला दिसे बाटली डोळ्याला
डोकं ठेवुन बाजुला जातो गुत्त्यावरती

गेला घोट एक पोटी म्हणजे बोलतो इंग्रजी
मग राजा जसा राज्य करतो जगावरती
जग होतसे धूसर सारे दिसते डबल
मग दुकानही फिरू लागे स्वतभवती:

पुढे सारे हो अंधारी वाटे फिरावे माघारी
आता कपड्यात लघवी भान नाही
कोठे होतो कोठे आलो काय केले मी स्वतचे:
कसे येऊ मी बाहेर त्याचे ज्ञान नाही

- अनिल अवचट